Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणीशेजारी,
आघारकररिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Email :secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

क्र. रा.मं./परीक्षा-८/१४८६
पुणे - ४११००४
दिनांक - १५/०३/२०२२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषयः-** मार्च-एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी परीक्षा दालनात विलंबाने येणा-या परीक्षार्थ्यांना प्रवेश नाकारणेबाबत

**संदर्भ :-** १. या कार्यालयाचे क्र. रा.मं./परीक्षा-८/६९५ दि. ९/२/२०२२ रोजीचे पत्र.
२. या कार्यालयाचे क्र. रा.मं./परीक्षा-८/७७० दि. ११/२/२०२२ रोजीचे पत्र.
३. राज्य मंडळाने केंद्रसंचालक पुस्तिकेद्वारे विविध घटकांसाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व इतर अनुषंगिक सूचना.
४. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या दि. १४/३/२०२२ रोजीच्या ऑनलाईन बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने प्राप्त निर्देश.

उपरोक्त विषय व संदर्भानुसार सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची लेखी परीक्षा दि. ०४/०३/२०२२ ते दि. ०७/०४/२०२२ व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) ची लेखी परीक्षा दि. १५/०३/२०२२ ते दि. ०४/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आल्याचे आपणांस विदित आहेच.

सदर परीक्षांसाठी नियुक्त करण्यात आलेले परिरक्षक, सहा. परिरक्षक (रनर/बैठे पथक) केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक, विभागीय मंडळ तसेच अनुषंगिक घटकांसाठी आवश्यक सूचना लेखी स्वरूपात राज्य मंडळामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित मार्च-एप्रिल २०२२ च्या उपरोक्त परीक्षांसाठी संबंधीत घटकांना विशेष मार्गदर्शक सूचना देखील मंडळामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

लेखी परीक्षेसाठी विहीत वेळेपेक्षा (सकाळ सत्रात १०.३० वा. व दुपार सत्रात ३.०० वा.) उशिराने येणा-या विद्यार्थ्यांबाबत करावयाच्या कार्यवाहीचा तपशील नमूद करण्यात आलेला आहे. उत्तरपत्रिका लेखन प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना परीक्षागृहात प्रवेश देवू नये. मात्र अपवादात्मक परिस्थितीत सदर वेळेनंतर १० मिनिटे उशिरा येणा-या परीक्षार्थ्यांना विलंबाच्या कारणाची खातरजमा करून केंद्रसंचालक स्तरावर परवानगी द्यावी. उपरोक्त १० मिनिटांनंतर अतिशय अपवादात्मक परिस्थितीत विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होण्यास केंद्रावर आल्यास व त्यामागचे कारण केंद्रसंचालकांना रास्त वाटल्यास त्यांनी विभागीय अध्यक्ष/विभागीय सचिव यांची दूरध्वनीवरून पूर्वमान्यता घेवून आणखी १० मिनिटे (एकूण २० मिनिटांचा) विलंब क्षमापित करून परीक्षार्थ्याला परीक्षेस प्रविष्ठ करून घेता येईल अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(पुढील पानावर)

तथापि, उपरोक्त सवलतीचा लाभ घेवून लेखी परीक्षेस उशिरा प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये गैरमार्गाने प्रसारीत झालेला प्रश्नपत्रिकेतील आशय असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब अतिशय गंभीर असून अशा प्रकरणांमध्ये संबंधीतांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तथापि, या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी लेखी परीक्षेस उशिराने प्रविष्ठ होवू देण्याची सवलत दि. १६/०३/२०२२ पासून बंद करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थी, मुख्याध्यापक/प्राचार्य, केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक, परिरक्षक व अन्य संबंधीत घटकांना सदर बाब तातडीने अवगत करावी व पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

१. सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर (प्रश्नपत्रिका वाटप करण्याच्या वेळेपर्यंत) म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स. १०.२० पर्यंत आणि दुपारच्या सत्रामध्ये दु. २.५० पर्यंत परीक्षा कक्षामध्ये हजर राहणे बंधनकारक राहील.
३. विद्यार्थी अपरिहार्य कारणामुळे परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू होतेवेळी म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स. १०.३० वा. व दुपारच्या सत्रामध्ये दु. ३.०० वा. पर्यंत आल्यास त्याचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी त्यांची तपासणी करून विद्यार्थ्यास विभागीय मंडळाच्या मान्यतेने परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात यावी.
४. परीक्षा सुरू झाल्यानंतर म्हणजेच सकाळच्या सत्रामध्ये स. १०.३० नंतर व दुपार सत्रामध्ये दु. ३.०० नंतर कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश देण्यात येवू नये.

तसेच सर्व मा. विभागीय आयुक्त व मा. जिल्हाधिकारी यांना जास्तीत जास्त दक्षता पथके कार्यान्वीत करून परीक्षा केंद्र/उपकेंद्रांना वारंवार भेटी देवून परीक्षा काळात होणा-या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी यथोचित कार्यवाही करण्यासंदर्भात शासन स्तरावरून निर्देश देण्यात आले आहेत. आपणही संबंधीतांशी संपर्क साधून याबाबत पाठपुरावा करावा.

तरी उपरोक्त सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत पुन:श्च संबंधीत घटकांना सूचना देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे प्रश्नपत्रिकांची सीलबंद पाकिटे विद्यार्थी व संबंधीत पर्यवेक्षकाच्या उपस्थितीत त्यांची स्वाक्षरी घेवून उघडण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यासाठी निर्धारित केलेल्या सूचना व वेळेचे बंधन यांचे काटेकोर पालन करण्यात यावे. प्रश्नपत्रिका फोटो काढून वा अन्य मार्गाने प्रसारीत होवू नये यासाठी मोबाईल व अन्य तत्सम साधने सर्व संबंधीत घटकांना बाळगण्यास व वापरण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. याचीही प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच परीक्षेदरम्यान संबंधीत घटकांच्या मोबाईल क्रमांकाचे आवश्यकतेनुसार CDR तपासण्यात येवून गैरमार्गाशी संबंधीत मोबाईलचा वापर आढळून आल्यास संबंधीत घटकांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, याचीही जाणीव संबंधीत घटकांना करून देण्यात यावी.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

क्र. कोविमं/डीपी/मार्च-एप्रिल २०२२/ ३९५८
दिनांक १६.०३.२०२२

प्रत.

सर्व परिरक्षक / केंद्रसंचालक / उपकेंद्रसंचालक
सातारा / सांगली / कोल्हापूर

उपरोक्त पत्रानुसार सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हयातील सर्व परिरक्षक / केंद्रसंचालक / उपकेंद्रसंचालक यांनी कार्यवाही करावी.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर